# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी - २२६१७९६९ फॅक्स-२६९०००७
E-mail: desk18@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

रजिस्टर एडी / स्पीड पोस्ट /ई-मेलद्वारे

क्रमांक: १८ /तंशिसं /डीबीटी /२०१८-१९/ ३१४
दिनांक : ०१/०७/२०१९

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता महाडीबीटी पोर्टलद्वारे राबविण्यात येत असलेल्या योजनांसाठी संस्था व विभागीय स्तरांवर तपासणीसाठी प्रलंबित असलेल्या अर्जाच्या तपासणीसाठी दिलेल्या मुदतवाढीबाबत....

संदर्भ :- १) या संचालनालयाचे पत्र क्र.:१८/तशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१९/१०४, दि. ०२/०३/२०१९
२) या संचालनालयाचे पत्र क्र.:१८/तशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१९/२३६, दि. २०/०५/२०१९
३) या संचालनालयाचे पत्र क्र.:१८/तशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१९/२८०, दि. १९/०६/२०१९
४) माहिती व तंत्रज्ञान विभाग मंत्रालय, मुंबई (डी.आय.टी.) यांचा प्राप्त संदेश.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता महाडीबीटी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांकरिता, विद्यार्थ्यांनी भरलेल्या परंतु संस्था व विभागीय / डिपार्टमेंट स्तरांवर आपल्या विभागांतर्गत येणाऱ्या संस्थांमधील तपासणीसाठी प्रलंबित असलेल्या योजनांच्या अर्जाच्या तपासणीची मुदत संदर्भ क्र.३ अन्वये दि.३०.६.२०१९ इतकी देण्यात आलेली होती. तरीदेखील संस्था व विभागीय / डिपार्टमेंट स्तरांवर सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार अर्ज तपासणीकरिता प्रलंबित असल्यामुळे, प्रलंबित अर्जाची तपासणी पूर्ण करण्याकरिता खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

| अर्ज तपासणी करण्यासाठीचा स्तर | मुदतवाढ दिनांक |
|---|---|
| संस्था स्तरावर | दि. ०९.०७.२०१९ पर्यंत |
| विभागीय / डिपार्टमेंट स्तरावर | दि. १४.०७.२०१९ पर्यंत |

सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, आपण आपल्या अखत्यारितील संस्थांना त्यांच्या लॉगीन आयडीमध्ये प्रलंबित अर्जाची तपासणी विहीत मुदतीच्या आत करुन घेण्याबाबत कळवावे व विभागीय कार्यालयानी त्यांच्या लॉगीन आयडीमधील प्रलंबित अर्जाची तपासणी दिनांक १२.०७.२०१९ पर्यंत पूर्ण करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठवावेत. तसेच, तपासणीसाठीच्या अंतिम दिनांकानंतर प्रलंबित राहिलेल्या अर्जाची सर्वस्वी जबाबदारी संस्था / सहसंचालक यांची राहील याची नोंद घ्यावी.

( डॉ. अभय वाघ )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

टीप - संस्था / विभागीय कार्यालय यांनी त्यांच्याकडे तपासणीसाठी प्रलंबित असलेले अर्ज अंतिम तारखेपर्यंत न थांबता तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे.

---

क्र.तंशिसं/विकाना/ईबीसी/२०१९/ 1964
दिनांक:— 4 JUL 2019

संचालक/प्राचार्य,
सर्व पदव्युत्तर पदवी, पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

शैक्षणिक वर्ष २०१८—१९ करिता महाडीबीटी पोर्टलद्वारे राबविण्यात येत असलेल्या योजनांसाठी अर्ज करण्यांकरिता तसेच तपासणी करण्यांकरिता वरिल पत्रात नमूद केल्याप्रमाणे मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तरी सर्व संस्थांनी पत्रात दिलेल्या निर्देशानुसार त्वरित कार्यवाही करावी.

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर.